जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 DEC 2024
लोकमत

# भारतीय संविधान जगातील आदर्श संविधान : भणगे

कोल्हापूर : संविधानातील स्वातंत्र, समता, बंधुता आणि न्याय मूल्यांमुळे भारतीय संविधान जगातील आदर्श संविधान आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील प्रा. डॉ. रवींद्र भणगे यांनी केले.

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील राज्यशास्त्र विषयांतर्गत संविधान दिनानिमित्त 'भारतीय संविधानाची अमृतमहोत्सवी वाटचाल' या ऑनलाईन व्याख्यानात ते प्रमुख वक्ते बोलत होते. प्र-संचालक डॉ. के. बी. पाटील अध्यक्षस्थानी होते.

उपकुलसचिव व्ही. बी. शिंदे उपस्थित होते. यावेळी प्रा. डॉ. भणगे म्हणाले की, राष्ट्रनिर्मिती आणि राष्ट्रबांधणी संविधानाच्या आधारेच होऊ शकते. संविधानाची अंमलबजावणी चांगल्या पद्धतीने राबविल्यामुळे संविधानाचे महत्त्व गेल्या ७५ वर्षांत अबाधित आहे. त्यामुळे भारतीय संविधानाकडे आदर्श संविधान म्हणून जग पाहात आहे. प्रा.डॉ. सचिन भोसले यांनी प्रास्ताविक व प्रा.डॉ. सूर्यकांत गायकवाड यांनी स्वागत केले. प्रा. डॉ. नितीन रणदिवे यांनी परिचय करून दिला. प्रा. प्रवीण लोंढे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सी. ए. बंडगर यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 DEC 2024
तरुण भारत

# विद्यापीठांतर्गत आठ परीक्षांचे निकाल जाहीर

■ मंगळवारी झालेल्या परीक्षेत २४ गैरप्रकार

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षेला १९ हजार ३१८ विद्यार्थी उपस्थित होते. दरम्यान, सर्टिफिकेट कोर्स इन डॉक्युमेंट्री फोटोग्राफी, पी.जी. डिप्लोमा जिओ इन्फॉर्मेटिक्स, सर्टिफिकेट कोर्स इन पाली लॅंग्वेज, डीआयटी कॉमर्स आदी ८ विषयांचे निकाल जाहीर झाले आहेत.

विद्यापीठ संलग्न महाविद्यालयातील १६७ केंद्रावर परीक्षा सुरळीतपणे पार पडल्या. बॅचलर ऑफ आटर्स, बॅचलर ऑफ व्होकेशन नर्सिंग अँड हॉस्पीटल मॅनेजमेंट, बॅचलर ऑफ आर्किटेक्चर, बॅचलर ऑफ कॉम्प्युटर ?प्लीकेशन, बॅचलर ऑफ एज्युकेशन, बी.एस्सी. (शुगर टेक्नॉलॉजी), बॅचलर ऑफ आटर्स डिफेंन्स स्टडीज, बीए इन ड्रेस मेकींग अँड पॅ ञ्शन आदी ७३ विषयांचा यात समावेश आहे. कोल्हापूर २०, सांगली २ व सातारा २ असे तीन जिल्ह्यातून २४ गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत करण्यात आल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 4 DEC 2024
सकाळ

# चार परीक्षांचे निकाल विद्यापीठाकडून जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने आज विविध चार परीक्षांचे निकाल जाहीर केले. त्यात सर्टिफिकेट कोर्स इन डॉक्युमेंटरी फोटोग्राफी, पी. जी. डिप्लोमा इन जिओइन्फॉर्मेटिक्स, पाली भाषा, डीआयटी कॉमर्स या अभ्यासक्रमांचा समावेश आहे. विद्यापीठाने आज बी. ए. फिल्म मेकिंग, बी. व्होक. नर्सिंग अँड हॉस्पिटल मॅनेजमेंट, बिल्डिंग टेक्नॉलॉजी अँड इंटिरिअर डिझायनिंग, बॅचलर ऑफ आर्किटेक्चर अशा विविध अभ्यासक्रमांच्या ७३ विषयांच्या परीक्षा घेतल्या. त्यासाठी १९ हजार ३१८ विद्यार्थी हजर होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 DEC 2024
पुढारी

# विद्यापीठ हिवाळी सत्र परीक्षेंतर्गत आठ विषयांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षेला १९ हजार ३१८ विद्यार्थी उपस्थित होते. दरम्यान, सर्टिफिकेट कोर्स इन डॉक्युमेंट्री फोटोग्राफी, पी.जी. डिप्लोमा जिओ इन्फॉर्मेटिक्स, सर्टिफिकेट कोर्स इन पाली लँग्वेज, डीआयटी कॉमर्स आदी ८ विषयांचे निकाल जाहीर झाले आहेत.

बॅचलर ऑफ आटर्स, बॅचलर ऑफ व्होकेशन नर्सिंग अँड हॉस्पीटल मॅनेजमेंट, बॅचलर ऑफ आर्किटेक्चर, बॅचलर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लीकेशन, बॅचलर ऑफ एज्युकेशन, बी.एस्सी. (शुगर टेक्नॉलॉजी), बॅचलर ऑफ आटर्स डिफेन्स स्टडीज, बीए इन ड्रेस मेकींग अँड फॅशन आदी ७३ विषयांचा यात समावेश आहे. कोल्हापूर (२०), सांगली (०२) व सातारा (०२) असे तीन जिल्ह्यातून २४ गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत करण्यात आली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 DEC 2024
सकाळ

# ‘मंडलिक’च्या तीन मल्लांची आंतरविभागीय स्पर्धेसाठी निवड

**सकाळ वृत्तसेवा**

मुरगूड, ता. ३ : शिवाजी विद्यापीठांतर्गत कोल्हापूर विभागीय कुस्ती स्पर्धेत येथील सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयाच्या तीन मल्लांनी ग्रीको रोमन व फ्री स्टाईल कुस्ती स्पर्धेत यश संपादन केले. त्यांची सातारा येथे होणाऱ्या आंतरविभागीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

जयवंत महाविद्यालय इचलकरंजी यांच्या संयोजनाखाली कुस्ती स्पर्धा झाल्या. स्पर्धेत मुरगूडच्या सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयाच्या यश खाडे याने ७७ किलो वजनी गटात ग्रीको रोमनमध्ये प्रथम क्रमांक पटकावला. ७९ किलो वजनी गटात प्रशांत मांगोरे याने फ्री स्टाइलमध्ये द्वितीय क्रमांक पटकावला. सुदेश नरके याने फ्री स्टाईलमध्ये ८६ किलो वजनी गटात तृतीय क्रमांक मिळवला. तिघांचीही सातारा येथे होणाऱ्या आंतरविभागीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे. मल्लांचा प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे यांच्या हस्ते महाविद्यालयात सत्कार करण्यात आला. यावेळी प्रा. डॉ. शिवाजी पोवार, प्रा. डॉ. महादेव कोळी आदी उपस्थित होते.